International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 2, Issue 11, pp: 493-498 www.ijaem.net ISSN: 2395-5252

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रवाद.

डॉ. उज्वला वंजारी

*सहयोगी प्राध्यापक, जे. एम. पटेल कॉलेज, भंडारा.*

Date of Submission: 15-12-2020 Date of Acceptance: 30-12-2020

**सारांश :** 19 व्या शतकापासून यरोप आणि आशिया खंडाला नवी दिशा देणारी एक प्रमख प्रेरणा महणून राष्ट्रवादाचा निर्देश करता येतो एक राजकीय विचार प्रणाली या अर्थाने राष्ट्रवाद महणजे राष्ट्राचे स्वातंत्य आणि एकता कायम राखणे राष्ट्रवाद ही स्वयंसिद्ध नैतिक तिक भूमिका या नात्याने स्वातत्र्याच्या हक्काचा परस्कार करते राष्ट्रवाद या संकल्पनेचे मूक जर्मन तत्त्वज्ञ काण्ट पर्यत नेता येते 'कोणत्याही स्वतंत्र राष्ट्रात तेव्हा व्यक्तिस्वातंत्र्याची योग्य पाठराखण होऊ लागते तेव्हाच ते राष्ट्र खज्या अर्थाने स्वतत्र बनते' असे अठराव्या शतकातील जर्मन तत्त्ववेत्ते इमेंन्युएल काण्ट यांनी म्हटले होते . त्यांच्या मते, नैतिक अर्थाने प्रत्येक व्यक्ती स्वायत्त असते व्यक्तीच्या स्वतःची अनुमती हीच नीतिमूल्यांची जननी आहे. त्यांच्या या प्रतिपादनामुक्े व्यक्ती ही धर्म आणि समाज यांच्या विधातक बंधनातून तत््वता मक््त झाली हे खरे पण या सर्व स्वायत्त व्यक्तीना एकत्र जोडणारा कोणताही तात्विक दुवा अस्तित्वात नसेल तर ससंघटित आणि अर्थपूर्ण समाजजीवन निर्माण होऊ शकणार नाही ही गोष्ट 'राष्ट्र ' या संकल्पनेमुक्ठे शक्य झाली. योहान फिक्टे या जर्मन तत्त्ववेत्यानेही व्यक्ती जीवनाची राष्ट्र जीवनाशी सागड घातली त्याचप्रमाणे मार्क्स , लेनिन आणि स्टेलिन या मार्क्सवादी विचारवंतानी राष्ट्रवाद व भांडवलशाही समाजव्यवस्था ही एकाच संस्थेची दोन रूपे मानली "कामगारांना पितृभूमी नसते" है कार्ल मार्क्स यांचे वचन अत्यंत प्रसिद्ध आहे.

भारतात एकोणिसाव्या शतकात स्वातंत्र्य चल्ठवव्ठीतून राष्ट्रवादी भावना जोपासली गेली, ब्रिटिशांच्या राजवटीतून भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा एक स्वतंत्र राष्ट्र महणून उभे राहताना विकास आणि ज्ञानाधिष्ठित समाजरचना निर्माण करणे आणि जागतिक शांतता व सहकार्य साध्य करणे हे महत्त्वाचे होते त्यासाठी देशाने संविधान स्वीकारले स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता ही मुल्ये राष्ट्रवादाची दूयोतके महणून घोषित झालेली होती त्यामत् राष्ट्रवादाची संगत धर्माशी न घालता उपरोक्त संविधानिक मूल्याशी घालणे है महत्त्वाचे होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची मांडणी संविधानाच्या रुपाने केली

अगदी प्राचीन काव्ठात मोठ्या मानवी सभ्यता उदयाला आल्या त्यात इजिप्शियन, मेसोपोटामियन आणि सिंधू संस्कृती या तीन संस्कृतीचा समावेश होतो . ख्रिस्तपूर्व बाराशे वर्षापासून इसवीसनाच्या चौदाव्या शतकापर्यत मोर्य, गप्त,सातवाहन ,चालक्य ,राष्ट्रकट ,मोगल ,मराठा आणि ब्रिटिश साम्राज्य ठटयास आली आणि त्यामुक्ठे भारतात वेगवेगब्व्या जातीचे ,धर्माचे, संस्कृतीचे आणि भाषेचे लोक एकत्र वसलेले आहे. याचा परिणाम महणजे कठल्याही एका धर्माची मक्तेदारी भारतात कधीच नव्हती है फार मोठे सत्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी ओकन््खले होते, त्यानसारच त्यांनी भारतीय संविधानाची रचना केलेली आहेत. प्रस्तत शोधनिबंधात डॉ आंबेडकरांच्या राष्ट्रवादी विचारसरणीचा आढावा घेतलेला आहे.

**Keywords:** 'राष्ट्रवाद '_ 'राष्ट्र आणि राष्ट्र भूमी यांना आदर्श मानून त्यावर निष्ठा ठेवणारी आधुनिक राजकीय विचार प्रणाली व त्यावर आधारलेला ध्येयवाद म्हणजे राष्ट्रवाद होय. ' या अर्थाने राष्ट्रवाद या शब्दाचा उपयोग प्रस्तुत लेखात केलेला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे व एकसंघ राष्ट्राचे हित पाहणारे नेते होते. भारतीय समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याच्या हतूने त्यांनी विविध चकुवक्ली उभारून व

International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 2, Issue 11, pp: 493-498 www.ijaem.net ISSN: 2395-5252

बहपेडी मांडणी करून स्वतःला आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून सिद्ध केले .तत्कालीन भारतीय समाजजीवनात असणाय्या जिवंत व ज्वलंत प्रश्नांचा त्यांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास केला त्यामुक्ठे एक व्यासंगी व निस्पृह विचारवंत महणून त्यांचा जगाला परिचय झाला. विसावे शतक. है नव समाज निर्मितीचे व प्रबोधनाचे शतक महणून ओव्खले जाते या शतकात संपूर्ण भारत हा ब्रिटिश राजवटीच्या अमलाखाली होता. संपूर्ण देशावर ब्रिटिशांची राजसत्ता होती या काछात भारतात अनेक जटिल टिल प्रश्न होते कामगार शेतकरी यांच्या प्रश्ना सोबतच जातीव्यवस्था +जाती व्यवस्थेतील उतरंड, स्त्रीवर होणारे अन्याय अत्याचार, आदिवासींचे शोषण ,रूढी,प्रथा,परंपरा, अंधश्रद्धांचे थैमान व पराकोटीची विषमता अशा अनेक प्रश्नाच्या गंतागंतीच्या जाब्ग्यात भारतीय समाजजीवन फसले होते या जाब्ग्यातून माणसाची मक्ती करण्याचे अथक परिश्रम व प्रयत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी करून भारतीय समाजातील विशेषत हिंदू समाज व्यवस्थेतील जन्मसिद्ध विषमता आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी लढा उभारला व आयुष्यभर संघर्ष करीत राहिले .'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर है विसाव्या शतकातील भारतामधील एक महापरुष होते असे महटल्यास वावगे ठरणार नाही '1 असा बाबासाहेब आंबेडकर यांचा गणगौरव डॉ. नल्िनी पंडित यांनी केलेला आहे तो कठेही अतिशयोक्क्त वाटत नाही.

सामाजिक, सांस्कृतिक ,शैक्षणिक ,राजकीय अशा स्वरूपाच्या चक्वव्ठी डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी उभारून विसाव्या शतकाच्या मध्यापर्यत भारतीय समाजाचे नवजागरण केले शोषणमुक्त समाज व त्यातून उदयाला आलेल्या नव्या माणसाचा शोध ते सातत्याने घेत होते व त्यासाठी त्यांनी समाजवादी अर्थव्यवस्थेचा प्रस्कार केला 'समाजवादी अर्थव्यवस्था ची सूत्रे विधिमंडब्छाच्या हातात न सोपवता ती कायदेशीर रित्या संविधानात समाविष्ट करण्याची इ्ढ इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. संसदीय बहुमतानेही समाजवाद बदलता येऊ नये यासाठी संविधानाचा तो शाश्वत भाग म्हणावा " 2 असे त्यांना वाटत होते . लोकानी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी व लोकप्रतिनिधींची विधीमंडढ्ठ व लोकसभा या संस्थासुद्धा समाजवादी अर्थव्यवस्थेचा बूज राखतील असे त्यांना वाटत होते. आजचे विधानसभेचे व लोकसभेचे स्वरूप पाहिले की डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधानाला तिलांजली देणारे वाटते त्यामुक्े लोकांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारलेली राष्ट्रवादाच्या संदभोतील भूमिका अत्यंत महत्वाची वाटते.

मानवी जीवनाचा प्रवास हा व्यक्ती कटब समाज आणि राज्य अशा सस्थात्मक उदयांनी झालेला आहे त्यामुक्ठे राज्य आणि राज्यातील सत्ता कोणाच्या हातात आहे त्यावर त्या राज्यातील जनतेचा विकास अवलंबून आहे. त्यामुकेच सत्तेतून समाज परिवर्तनाची अपेक्षा डाक्टर बाबासाहेब आंबेडकर करीत असतात "सत्ता हे समाज परिवर्तनाचे नुसते प्रभावी साधन नाही तर सर्वात प्रभावी साधन आहे आणि ते जसे समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे तसेच समाज परिवर्तन गोठविण्याचेही साधन आहे, कारण सत्ता हे साधन आहे.समाज परिवर्तन करू इच्छिणाय्या पक्षाच्या हातात समाज परिवर्तनाचे साधन होते प्रश्न सत्ता कोणाच्या हातात आहे हा असतो समाजपरिवर्तनाच्या घोषणा करणाय्यांच्या हातात सत्ता असली महणजे समाज परिवर्तन होत नाही कारण घोषणा आणि कृती यात फार मोठे अंतर असते सत्तेकडून घडणारी कृती समाज परिवर्तन घडवते, सत्तेत असणाय्यांच्या घोषणा समाज परिवर्तन घडवत नाही"4 हे नरहर कुरुंदकर या विचारवंतांचे मत समाजपरिवर्तनाच्या हत्त्यार वापरू पाहणाय्या विशेषता आंबेडकरवादाच्या संदर्भीात सत्ता आणि समाज परिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या अभ्यासक कार्यकर्त्यांना उद्बोधक ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी State and Minorities 'मध्ये महटले होते मोठमोठे आणि मूलभूत उद्योग राज्याचा मालकीचे असावेत जेणेकरून त्या उदयोगाचा लाभ बंचिता पर्यत पोहोचेन, परत राज्याच्या मालकीचे उद्योग चालवणारे सरकार आणि प्रशासन याविषयी किती गंभीर आहेत यावर या उदयोगाचे व राज्याचे भवितव्य अवलंबून आहे. आपले स्वातंत्र्य पूर्वीची व नंतरची नोकरशाही ही

International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 2, Issue 11, pp: 493-498 www.ijaem.net ISSN: 2395-5252

संपूर्ण तब्ठागाव्ठात जगणाय्या माणसाविषयी फारशी उत्साही असल्याचे दिसून येत नाही. त्यामुक्ठे राज्यसंस्थेचे वर्ग चारित्र्य न तपासता अभ्यासकांना डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारांचे परेसे आकलन होत नाही. लोकशाही व संविधानातील मूल्यांची दखल घेण्याइतपत कठल्याही वैचारिक विवेकी व विज्ञाननिष्ठ संस्कार असणारे त्रोकप्रतिनिधी नाही हे 'तेवढेच खरे है आजचे भयानक व भयभीत करणारे वास्तव या शोधनिबंधात मी अधोरेखित करीत आहे या पार्श्वभूमीवर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय राष्ट्रवाद या विषयावरील विचार विशेष महत्त्वपूर्ण वाटते.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रवाद

डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रवादाचा पाया है लोकशाहीला मानतात. त्यांनी लोकशाहीची व्यापक संकल्पना मांडली आहे. ते महणतात, 'Democracy is a form of Government where revolutionary changes occur without bloodshed' , रक्ततपात विहीन क्रांती म्हणजे लोकशाही होय. असे लोकशाहीचे महत्त्व व मूल्य विशद करून त्यांनी वेब्ठेवेव्ठी राष्ट्रवादाच्या विषयी आपली मते मांडली आहेत. स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वांनी त्यांच्या लोकशाहीला भक्कम रूपबंध प्राप्त झाला. आपल्या जिवापेक्षाही लोकशाहीवर अधिक जीव लावणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे स्वतंत्र भारताच्या आधुनिक शिल्पकारांपैकी एक प्रभावी शिल्पकार आहेत .भारतीय संविधानाचे शिल्पकार तसेच आधुनिक भारताचे प्रभावी शिल्पकार महणूनही त्यांची नाममुद्रा भारतीय संसदीय लोकशाहीच्या व संघटनात्मक लोकशाहीच्या सोनेरी पानावर मद्रित झालेली आहे .लोकशाहीवर आपली निष्ठा प्रेम आणि जिव्हाढ्ा त्यांनी व्यक्त केला ते महणतात , But seems to me that lies on us a dry impartant to see that democracy does not vanish from the earth as a governing principle of human relationship. If we believe in it, we must true and.loyal to it , we must not only be staunch in our faith in democracy, but we must resolve to see that in what ever we do ,we do not help the enemies of democracy to unroot the principles. A liberty, equality, and fraternity" 6 हे त्यांच लोकशाही विषयक मत महणजे लोकशाहीचा गौरव तर आहेच परंतु ती वाचवण्याची जबाबदारी आपण सर्वानी स्वीकारावी असे त्यांना वाटते. लोकशाही पृथ्वीतत्रावरून नामशेष होऊ नये असे त्यांना वाटते कारण लोकशाही मानवी संबंधातील नियंत्रणाचे तत्त्व आहे महणून आपण सर्वानी लोकशाही प्रती निष्ठा व्यक्त करून ती संपुष्टात आणणारा तिच्या शत्रूला मदत होईल असे कृत्य करू नये ' मी प्रथम भारतीय आहे शेवटी भारतीय आहे आणि भारतीय असल्या खेरीज अन्य कोणीच नाही'7 असे ते 1938 कालात म्हणालेय. भारतीय खंड हा विविध धर्म, विविध संस्कृती आणि पंथ व भिन्न भिन्न उपासना पद्धती, हजारो जाती इत्यादींच्या वैविध्य पूर्ण जाब्व्यांनी विणलेले राष्ट्र आहे सर्वानी आपापल्या संकचित सांस्कृतिक भावनिक बाबी दूर ठेवून राष्ट्रीय प्रवाहात येऊन व्यापक अशा राष्ट्र भावनेला व्यापक राष्ट्र संस्कृतीला तडा जाणार नाही याची प्रत्येकाने दखल घेऊन राष्ट्र भावनेला तडा देणारी दुसरी कोणतीच निष्ठा जोपासणे गुन्हाच मानला पाहिजे असे त्यांना वाटते. त्यांनी आपले राष्ट्र विचार 'थॉट्स ऑफ पाकिस्तान', 'राज्य आणि अल्पसंख्यांक' 'जातीयता निर्मूलन', रानडे, गांधी आणि जीन्ना ' इत्यादी वैचारिक ग्रंथातून राष्ट्रवादाच्या संबंधीचे विचार व्यक्त केलेले आहे. 'राष्ट्रवाद' ही एक व्यक्तिनिष्ठ भावना आहे तसाच तो नाजूक विचारही आहे आणि महणून राष्ट्रवादाचा

संबंध माणूस आणि मानवी व्यवहाराशी असतो. ' 'राष्ट्रवाद या भावनेत प्रचंड सामर्थ्य असून तिचे मुके खूप खोलवर रुजलेली असतात .मोठमोठी साम्राज्य उत्र्थून टाकतात तिला कितीही विवेकशून्याने पाहिले तरी ती मात्र अति प्रबछ शक्ती आहि राष्ट्रवादी भावनेने जगाच्या इतिहासात हिंसाचार हाहाकार जसे घडवून आणले तसेच राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे संरक्षण संपादन केलेले आहे ती जेवठी विध्वंसक तेवढेच विधायक शक्ती आहे "8असे त्यांना वाटते परंत तिची विध्वंसक बाजू लक्षात ठेवून युरोपमधील सिडने ,ब्रक्स ,नशर्मल ऐंजल या राजकीय विचारवंतांनी तीला मानवतेचे शत्रू महणून संबोधले. रॉबर्टसन या विचारवंताने राष्ट्रवाद या भावने विषयी बोचरी प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे राष्ट्रवाद ही एक अ-बौदधिक भावना

International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 2, Issue 11, pp: 493-498 www.ijaem.net ISSN: 2395-5252

आहे त्यामुळे मानवतेचे काहीच भले होणार नाही यावर डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिक्रिया देकन म्हणतात,'" राष्ट्रवाद भावनेची एक विध्वंसक बाजू असली तरीही तिला विधायकतेचीही दुसरी बाजू आहे. राष्ट्रवाद या संकल्पनेचा परामर्श घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक, आर्थिक व राजकीय विषमता नष्ट करण्यासाठी व समाजाचे ऐक्य बळकट करण्यासाठी राष्ट्रवादाचे सुप्त सामर्थ्य त्यांनी अधोरेखित केल्याचे दिसून येते. भारताच्या स्वातंत्र्य पूर्व काळात आणि स्वातंत्र्या नंतरही उपेक्षितांच्या डोब्ायातील अश्रू वा न जोपर्यंत सर्वाना समान संधी व मानवी हक्क मिळत नाहीत तोपर्यंत माणसाची मुक्ती शक्य नाही देश स्वतंत्र होतात आणि जनता मात्र पारतंत्र बघते देश मक्त होतात आणि माणसे मात्र दास्यातं जगतात हा अनभव त्यांनी उड्या डोब्यांनी घेतला होता .अमेरिका स्वतंत्र झाली प्ण काढ्ठ मात्र काळोखातच रडत राहिला महणून डॉ आंबेडकरांचा राष्ट्रवादाचा शोध आपल्याला उपेक्षितांच्या, सवर्णाच्या, शोषितांच्या, कष्टकय्यांच्या, शेतकय्यांच्या वर्गीय विकासक्रमात घ्यावा लागेल. तद् वतच देशातील साधनसंपत्ती, खनिज संपत्ती,जमीन यावर सर्वाचा मालकीहक्क रोजगार क्षेत्र, उद्योग क्षेत्र, वैज्ञानिक संशोधन ,आरोग्यसेवा व कृषी क्षेत्राचा विकास, लोकसंख्या नियंत्रण इत्यादी राष्ट्रिय योजनांची सर्व भारतीयांचे नातेबंध ते राष्ट्रवाद या संकल्पनेशी जोडतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते राष्ट्रवाद ही व्यापक विचारसरणी असून देशातील तमाम नागरिकांचे हित जोपासणारी शक्ती आहे. .तद्वतच ती राष्ट्रीय संपत्तीत सर्वाना सहभागी होण्याची संधी व नागरिकांचे जीवनमान उंचावणारी प्रेरणा देते व सर्वाना सुरक्षा प्रदान करण्याचे लोकशाहीला संवरधित व समृद्ध करण्याचे अभिवचन देते .

भारतीय राष्ट्रवादाचा विचार एकांगी करून चालणार नाही कारण भारताच्या भूमीवर वेगवेगब्या धर्माची,पंथाची, विचारांची मजबूत पण गुंतागूंतीची पकड कायम आहे परिवर्तनाचे साध्य घेऊन भारतीय राजकारणात दोन प्रवाह स्वातंत्र्यपूर्व काळापासून व्ठाप सून अस्तित्वात होते आधी सामाजिक सुधारणा की राजकीय स्वातंत्र्य या दोन्ही भूमिकेवर भारतात चळवळी उभारल्या गेल्यात परंतु प्रस्तुत दोन्ही भूमिकांचा विचार वर्तमानात सुटा सुटा करून आपल्याला सामाजिक परिवर्तन परिवर्तनाचे लक्ष गाठता येणे अवघड आहे देशाच्या अखंड प्रयत्न प्रदेशातील सामाजिक मागासलेपणा आर्थिक दुर्बलरता,पराकोटीचे दारिद्रय कुपोषण, वाढती भयानक बेरोजगारी ,अतिजलद वाढणारी लोकसंख्या आणि वाढत्या लोकसंख्येने निर्माण केलैले आरोग्य, अन्नधान्य, बेरोजगारी, पर्यावरण, जल्संकट, भूमीप्रदूषण वनावावरील अतिक्रमण, नैसर्गिक संसाधनाचा ड्हास, दकणवकणाचे प्रश्न, माणसाची स्थलांतर, सामाजिक असमतोल अशा गुंतागुंत असलेल्या प्रश्नांच्या आणि समस्येच्या किंबहना संकटाच्या जबड्यात आपण सापडलो आहोत त्यामुक्ठे सामाजिक सधारणा आणि राजकीय लढे यांची सांधेजोंड झाल्याशिवाय महणजेच समन्वय झाल्याशिवाय राष्ट्रवादाचा विचार करणे पदरी अपयश पाडून घेणे होईल. देशाच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी त्यांनी सैन्य दलाचे आधुनिक शस्त्रास्त्रे धोरण व रक्षणार्थ कृती जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच राष्ट्रांतगत सामाजिक सुधारणांची गती असली तरच आपल्याला भारतीय संविधानाप्रमाणे भारतीय राष्ट्रवादाचे साध्य गाठता येईल. येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राष्ट्रवादी भूमिकेतून मांडणी करायची असल्यामुब् स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक सुधारणांची चळवर् त्यांनी प्राधान्याने उभारलेली होती महाड येथील चवदार तब्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह यासोबतच त्यांनी गोलमेज परिषद, पुणे करार, कामगार पक्ष, शेड्युल कास्ट फेडरेशन, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया अशा राजकीय भूमीका वठवल्या होत्या. स्वातंत्र्योत्तर काळात "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" अशा नावाने राष्ट्रीय स्तरावर राजकीय पक्ष करण्याची कल्पना मांडली होती. तात्पर्य असे की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक सुधारणा सोबतच राजकीय सुधारणांचा समन्वय साधला होता त्यांच्या निधनानंतर मात्र त्यांच्या सामाजिक व राजकीय भूमिकांचा परामश त्यांच्यावर अभ्यास करणाय्या अभ्यासकांना प्रभावीपणे व यशस्वीपणे घेता आला असता तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित

International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 2, Issue 11, pp: 493-498 www.ijaem.net ISSN: 2395-5252

राष्ट्रवादाची व राजकीय भूमिकांची आज घडीस दिसते तेवढी वाताहात झालेली नसती.

डॉ. बाबासाहेब यांच्या नावाने राजकारण करणा-्यांचा अक्षरशः महापूर असल्याचे दिसून येते जगातील सर्व राजकीय पक्षांची बेरीज करा त्यापेक्षा आंबेडकरांच्या नावाने उठटयास आलेल्या कमअस्सल पक्षांची संखया अधिक भरेल हे पक्ष कसले काहीना टोब्व्याच महणता येईल है सारेच पक्ष निवडणुकीच्या गुकीच- मोसमात बहरतात निवडणूक णूक संपली की कुठल्यातरी कोपय्यात कोमजलेल्या फुलाप्रमाणे आसनस्थ होतात, परेतु निवडणुका आल्या की पुन्हा ताजेतवाने होऊन सत्ताधारी पक्षाकडे येऊन तिष्ठत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय वारसा चालवणारे प्रज्ञावंत, क्रांतदर्शी, निर्मोही, स्वाभिमानी राजकीय अशा सुजाण व्यक्तिमत्त्वाची पोकठीी आपल्या नजरेपुढे सतत दिसते. त्यामुके सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक अशा संकल्पनांचा अंतरंगातील सूक्ष्म पण स्फोटक प्रश्नाची प्रभावी उत्तरे शोधणारा राष्ट्रीय वाचन वारसदार शोधूनही सापडत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने शासकीय उद्योग चालवणारे अनेक आहेत त्याला ते आंबेडकरांचा वारसा समजतात ते त्यांनी खुशाल समजावे त्यांनी त्यातस ते खूष आहेत. असे राजकीय उद्योग चालवणारे राज योगी आपसल्या तंद्रीत आहेत.

डॉ. आंबेडकरांची राष्ट्रवादी भूमिका डोछसपणे, डावपेचात्मक, घटनात्मक मूल्यांच्या आधारे स्वीकारून त्या भूमिकेचा वर्तमानात राजकीय अमल करणारा हा द्रष्टा नायक या भारतीय लोकशाहीची व परिवर्तनवादी भारतीयांची सर्वोच्च मागणी आहे. हा नायक कुठून कोणत्या पक्षातून उदयास येयील हे इतिहासच सांगू शकेल.

मानवी जीवनाला विविध कंगोरे असतात हे खरे आहे परंत मानवी विकास हा माणूस कटंब, समूह, समाज, राजकारण अशा क्रमाने विकसित झालेला आहे. या विकासक्रमात सामाजिक रूढी, परंपरा, समूह धारणा, धर्म यासोबतच त्याला सर्वात जास्त प्रभावित करणारा घटक म्हणजे अर्थ होईल. हजारो वर्षापासून त्याचे जीवन अर्थ मूल्य आहे याकडे आपण गांभीर्याने पाहत नाही, कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेल्या सामाजिक आंदोलनावर आपने कक्ष केंद्रित केले गेले ते चूक नाही परंतु आंदोलने ही नेहमीच वर्तमान प्रश्न सोडवणारी असतात हयाचे आपल्याला भान असावे. कृषी विकास, रोजगार, रस्ते, घरबांधणी, उद्योग, शिक्षण, आरोग्य, या सर्व सोयी आर्थिकतेशी निगडित असतात यांच्याकडे आपण फारसे लक्ष दिले नाही. आंबेडकरी चब्ठवव्ठ ही फक्त सामाजिक चब्ठवक्ठ आहे असा हैका ठेवल्यामुक्े समाज परिवर्तन घडवून आणणारी चब्ठवक् पढे पढे क्षीण होत गेली. आर्थिक प्रश्नांच रसायन तिला मिल्ठाले नाही हे अनेक कारणांपैकी एक कारण आहे. आर्थिक प्रश्न सामाजिक रूप धारण करतात, राजकीय प्रश्नांची रूप धारण करतात हे प्रश्न राजकीय सामाजिक संस्कृतीक इत्यादी नावांनी ओबखतो ते सगे प्रश्न मुलतहा आर्थिक असतात नुसते पैशाचे नसतात तर हितसंबंधाचे असतात उत्पादनांच्या साधनावर ताबा आणण्याचे असतात या उत्पादन व्यवस्थेशी संबंध असण्याचे असतात*१० अशी सुंदर मांडणी नरहर करुंदकर या विचारवंताने केलेली आहे ती आपल्याला विचारात घ्यावीच लागेल. परंतु अशा मांडणीलाआपण माक्सवादी संबोधून मोकके होतो या मांडणीतील मर्म नीटअभ्यासले जात नाही अशा मांडणीकडे दुर्लक्ष करून आपण यशस्वी होऊ साला दूसरा रा भ्रम नाही अर्थसत्ता किती मोठी सत्ता असते, ती माणसे मतदार विकत घेते दूरचित्रवाणी, वेगवेगछूया वाहिनी, माध्यमे नियंत्रणात ठेवणारी राजकीय सत्ता ठरली आहे. देशातील काही धर्माच्या नावावर उदयास आलेल्या दहशतवादी संघटना या संघटनेचे सांस्कृतिक कार्यक्रम वरकरणी सांस्कृतिक वाटत असले तरी ते आर्थिक आहेत धर्म आणि जाती है आपल्या देशात वरिष्ठ वर्गानी सोयीने हाताव्ललेली हत्यारे आहेत असे राम मनोहर लोहिया यांनी म्हटले होते ही हत्यारे हातालण्याच्या मागील कोणाचे हित आहे आणि कणाचे अहित आहे हे समजल्याशिवाय वर्तमान राजकारण समजणार नाही .डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी आपण जातवार संघटना उभ्या केल्यात मुब्ठात जातीअंत व वर्ग अंत हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न आहे. जातिवाद

संघटनेमुक्ठे जातीव्यवस्था बढकट होत असल्याचे चित्र आहे तथापि बाबासाहेबांना अपेक्षित राष्ट्रनिर्मानात अडचणी येथील हैं मात्र खरे लोकशाहीला निवडणुकांच्या माध्यमातून बत्ठकट करण्याचे स्वप्न आपण पाहतो परंतु भारतीय मतदार हा विविध जाती ,धर्म, परंपरा, प्रथा, वर्ग संबंध इत्यादींच्या जाब्यात अडकलेला मतदार आहे. त्यांचा परंपरा व त्यांची जातीय निष्ठा, धर्मनिष्ठा किती चिवट होत्या हे निदर्शनास आले .बेरोजगारी, शिक्षण, महागाई ,कमी करू पाहणाऱ्या सरकारची गरज आज अधिक आहे. बेरोजगारी वाढवणाऱ्या,जाती संबंधात तणाव निर्माण करणाऱ्या,मुस्लिमांना खरिश्चनांना विलग करणाऱ्यांना व आर्थिक उन्नतीची खोटी आश्वासने देणाऱ्या पक्षाला जर आपण निवडून दिले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय सत्ता ही सर्वोच्च संकल्पना समजून घेण्यास समाज कुठेतरी चुकला असे वाटते .त्यांच्या या संकल्पनेत सामाजिक ,राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, |पर्यावरणीय , प्रादेशिक अशा साऱ्या तत्त्वाचा समावेश दडलेला आहे. म्हणूनच त्यांचा राष्ट्रवाद विचारात घेत असताना आपल्यातील जाती अहंकार इतर वरिष्ठ जातीवरील प्रतिक्रिया याकडे दुलक्ष करून त्यांनी सांगितलेल्या व्यापक अशा राष्ट्रवादाच्या मार्गने मार्गक्रमण करावे केवत्ठ जाती केव् धर्म केव्ठ सांस्कृतिक धार्मिक असे सुटे सुटे संघर्ष न करता त्या संघर्षाचा समन्वय चिंतनाच्या व व्यवहाराच्या पातक्वीवर साधला जावा अन्यथा निवडणका येतील ते विजय होतील आणि आपण निराशेच्या खाईत बसून लेखन करत राह हा मार्ग आपल्या आणि डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केलेल्या भारतीयांच्या हिताचा नाही 'सर्व भारतीय राष्ट्राचा एकत्रित विचार करण्याइतकी चौरस व व्यापक वैचारिक भूमिका त्यांच्याजवत्ठ होतीच. शिवाय बाबासाहेब अतिशय जहाल राष्ट्रवादी होते फकत महार समाजापरता असा विचार त्यांनी केला नाही तर सर्व सवर्ण व दलित यांचा समावेश करणारा राष्ट्रहिताचा विचार त्यांनी केला "11 नरहर करुंदकर यांचा विचार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील राष्ट्रवादी बाणा सिद्ध करतो.

## संदर्भ


[1]. नत्रिनी पंडित: आंबेडकर: ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, 1996

[2]. बाबासाहेब आंबेडकर: रायटिंग ऑँड स्पीचेस, खंड 1 , राज्य साहित्य संस्कृती मंडल, पृष्ठ 410

[3]. तत्रैव, पृष्ठ 412

[4]. नरहर करुंदकर: वाटा माइया आणि तझया, इंद्रायणी साहित्य, पुणे .पृष्ठ 45.

[5]. बाबासाहैब आंबेडकर उद्धृत, आंबेडकर तत्वज्ञान प्रचिती आणि अविष्कार : ताराचंद खांडेकर, प्रभा प्रकाशन/नागपूर .1981,पृष्ठ 140

[6]. बाबासाहेब आंबेडकर: भाषावार राज्यमीमांसा, सुगत प्रकाशन, नागपूर .1987,पृष्ठ 15.

[7]. बाबासाहेब आंबेडकर : रायटिंग अंड स्पीचेस खंड 2, महाराष्ट्र शासन मंबई , 1982,पृष्ठ 195

[8]. बी आर आंबेडकर :पाकिस्तान आर द पार्टिशन ऑफ इंडिया, ठकक्‌्कर प्रकाशन, मुंबई, दवितीय आवृत्ती 1945,पृष्ठ 206

[9]. बी आर आंबेडकर: डॉक्टर आंबेडकर का राजनीति दर्शन, डी आर जाटव, समता साहित्य सदन,जयपुर 1990,पृष्ठ 54

[10]. नरहर कुरुंदकर: भजन, इंद्रायणी प्रकाशन, पुणे, 2000,पृष्ठ 24.

[11]. तत्नैव